**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्य सरकार मराठा आरक्षणासाठी नवीन जीआर आणणार - उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती**
2. **शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर प्रसिद्ध झालेल्या तिएनजीन जाहीरनाम्यात पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध**
3. **आज ज्येष्ठा -गौरीचे घरोघरी मनोभावे पूजन**
4. **पूर्व विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट**

**---------------------------------------**

मराठा आरक्षण

राज्य सरकार मराठा आरक्षणाबाबत नवीन शासन निर्णय अर्थात जीआरआणण्याची तयारी करत आहे. मराठा उपसमितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीनंतर आरक्षण विषयक उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही माहिती दिली. हैदराबाद राजपत्राच्या संदर्भात काय करता येईल यावर बैठकीत चर्चा झाली. ते आम्ही या विषयावर एक मसुदा तयार केला आहे, परंतु न्यायालयीन सुनावणीमुळे महाधिवक्तांना जावे लागले. लवकरच हा मसुदा तयार केला जाईल आणि जीआर जारी केला जाईल, असे विखे पाटील म्हणाले. कुणबी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी गावातील नातेवाईक किंवा कुणबी प्रमाणपत्र धारकाच्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे आरक्षण लागू करण्याचा सरकार विचार करत असल्याचेही त्यांनी सांगितले.कुणबी नोंदींची तपासणी करण्यासाठी तालुका आणि ग्रामपंचायत पातळीवर एक नवीन छाननी समिती स्थापन केली जाईल, जेणेकरून गावपातळीवरच नोंदी तपासता येतील आणि शोधता येतील, अशी माहिती त्यांनी दिलीकायदेशीर चौकशी आणि महाधिवक्तांच्या मंजुरीनंतरच मसुदा जरांगे पाटील यांना दाखवला जाईल आणि अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.विखे पाटील म्हणाले की, जनहित याचिकेवरील न्यायालयीन सुनावणीनंतर आम्ही पुन्हा बैठक घेऊ. महाधिवक्ता मसुद्याच्या कायदेशीर बाबींची तपासणी करून त्याला मान्यता देतील. उच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या नाराजीनंतर काही सुधारणा अपेक्षित आहेत,

असेही त्यांनी सांगितले. दरम्यान न्यायालयाने सध्या आंदोलनासाठी दोन दिवसांची मुदत दिली आहे.

---------------------------------------

गृहराज्यमंत्री पंकज भोयर

कोणत्याही परिस्थितीत ओबीसी आरक्षणाला धक्का लावला जाणार नाही, असे स्पष्ट करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करण्याकरीता आंदोलन करण्यात येत असल्याची शंका राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी येथे व्यक्त केली. ते काल विदर्भातील भाजपाच्या ओबीसी आमदारांच्या पत्रपरिषदेत ते बोलत होते.

***(होल्ड बाईट- गृहराज्यमंत्री पंकज भोयर)***

***वैयक्तिकपणे आदरणीय देवेंद्रजी वर  कुठेतरी टीका करून अनेकवेळा अशी शंका येते कि केवळ देवेंद्रजींना टार्गेट कारण्याकरता या पद्धतीचा आंदोलन करण्यात येते का असं देखील त्या ठिकाणी मांडता येईल परंतु आपल्याला लक्षात येईल कि देवेंद्रजी पदावर आल्यानंतर त्यांनी त्याच्यावर पुढाकार  घेतला आहे आणि  मराठा समाजाला आरक्षण मिळवून  दिले***

ओबीसीतून आरक्षण देण्यात यावे ही मनोज जरांगेंची भूमिका आडमुठी आहे. त्यांच्या आंदोलनामुळे सर्वसामान्य मुंबईकरांचे जीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे जरांगेंनी आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली. मराठ्यांना यापूर्वी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

---------------------------------------

जाहीरनामा प्रसिद्ध

चीनमधे तिएनजीन इथं सुरू असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर तिएनजीन जाहीरनामा प्रसिद्ध  झाला. यात दहशतवादाविरोधात स्पष्ट संदेश देण्यात आला असून भारताच्या प्रादेशिक सहकार्य आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या  योगदानाची दखल घेण्यात आली आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला असून या हल्ल्या मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या आहेत. हल्ला घडवून आणणाऱ्यांना जबाबदार धरायला हवं अशी स्पष्ट भूमिका सर्व देशांनी घेतली तसंच दहशतवादाविरोधात लढण्यासाठी सर्व देश वचनबद्ध आहेत असं सांगितलं.  मे २०२५ मधे शांघाय सहकार्य संघटनेच्या थिंक टँक फोरम भारतात यशस्वी  आयोजन केल्याबद्दल सदस्य देशांनी भारताचं अभिनंदन केलं.

---------------------------------------

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात आज चीनमधे तियेनजिन इथं द्विपक्षीय चर्चा झाली. ऊर्जा, आर्थिक क्षेत्रात द्विपक्षीय संबंधामुळे सातत्याने होणाऱ्या प्रगतीबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं. युक्रेनमधील संघर्षासह अनेक प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही चर्चा झाली. युक्रेनमधला संघर्ष थांबवण्यासाठी रशियाने अलिकडे उचललेल्या पावलांवर मोदी यांनी समाधान व्यक्त केलं तसंच यावर लवकरात लवकर तोडगा काढावा अशी अपेक्षा व्यक्त केली. दोन्ही देशातील धोरणात्मक संबंध अधिक बळकट करण्यावर यावेळी सहमती झाली. त्याआधी प्रधानमंत्री मोदी आणि पुतीन यांनी बैठकीच्या ठिकाणापर्यंत एकत्र प्रवास केला. पुतीन यांच्यासोबतची चर्चा नेहमीच अर्थपूर्ण असते असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. त्यानंतर चीन दौरा आटोपून प्रधानमंत्री मोदी नवी दिल्लीसाठी  रवाना झाले आहेत.

---------------------------------------

सोने-चांदीच्या दरात वाढ

देशांतर्गत सराफा बाजारात आज तेजीचा कल दिसून येत आहे. दरात झालेल्या वाढीमुळे देशातील बहुतांश सराफा बाजारात 24 कॅरेट सोने आज प्रति 10 ग्रॅम 1 लाख  02 हजार 360 रुपये ते 1 लाख 02 हजार 510 रुपये या स्तरावर व्यवहार करत आहे. चांदीच्या दरात देखील वाढ झाली आहे. चांदी आज प्रति किलो 1,24,900 ते 1,26,000 रुपयांच्या स्तरावर विकली जात आहे.

---------------------------------------

गौरीपूजन

गणेशोत्सवादरम्यान आज राज्यात अनेक ठिकाणी गौरीपूजन होत आहे. घरोघरी सुरेख आणि सुबक गौरी प्रतिमा किंवा महालक्ष्मीच्या मुखवट्यांची प्रतिष्ठापना करुन त्यांना आकर्षक आरास केली जाते. पंचपक्वानांचा आणि स्थानिक मोसमी भाज्या आणि कृषी उत्पादनं वापरुन साग्रसंगीत नैवेद्य अर्पण केला जातो. उद्या गौरी विसर्जनाने या तीन दिवसांच्या सोहळ्याची सांगता होईल. गौरींबरोबरच्या गणपतींचं विसर्जनही उद्या होईल. काही ठिकाणी खड्याच्या गौरींची पूजा केली जाते. नागपुरात प्राचीन भोसले कालीन गौरींचे दर्शन करण्यासाठी भक्तांची गर्दी पाहायला मिळते.

---------------------------------------

कागदपत्रे पडताळणी

महावितरणमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दि. २० ते २२ ऑगस्टला पूर्ण झाली आहे. तथापि राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच इतर कारणांमुळे गैरहजर असलेल्या काही उमेदवारांच्या मूळ

कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दि. ९ व १० सप्टेंबरला शेवटची संधी देण्यात आली आहे.याबाबतची माहिती महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

---

एक तारीख, एक तास एक साथ'

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत वर्षाचे औचित्य साधून स्वच्छ, सुंदर, स्वस्थ नागपूर साकारण्यासाठी महिन्याच्या पहिल्याच दिवशी मनपा आणि नागपूर स्मार्ट सिटीच्या संयुक्त विद्यमाने व घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या 'एक तारीख, एक तास, एक साथ' या अभिनव उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यात लक्ष्मीनगर झोनमधील प्रभाग क्रमांक ३६ मध्ये सोनेगाव तलाव, धरमपेठ झोनमधील प्रभाग क्रमांक १४ मधील वॉकर्स स्ट्रीट या सह उर्वरित झोन्स मध्ये कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केली. यावेळी नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्या बरोबर पावसाळ्याच्या दृष्टीने विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

---

चंद्रपूर महानगरपालिका

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे शहरात मूर्ती विसर्जनाच्या सोयीच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेल्या 25 कृत्रिम कुंड आणि 3 फिरत्या विसर्जन कुंडात एकुण 2 हजार 917 मूर्तींचे विसर्जन कालपर्यंत करण्यात आले. मागील वर्षी पीओपीच्या मुर्तींचा वापर न करून नागरिकांनी प्रशासनास सहकार्य केले होते यंदाही श्रीगणेशोत्सवाच्या सुनियोजित आयोजनासाठी चंद्रपूर मनपा दक्ष आहे.

---

हवामान

विदर्भात अमरावती वर्धा नागपूर भंडारा गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला असून चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे दरम्यान उद्या देखील चंद्रपूर आणि गडचिरोली येथे मुसळधार पावसाचा ऑरेंज ऑलट असून गोंदिया मध्ये देखील मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आलायदरम्यान येत्या काही तासात विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.याशिवाय अकोला, वाशीम, अमरावती, वर्धा आणि

यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता  नागपूरच्या हवामान विभागाने वर्तवली आहे

---------------------------------------

मध्य रेल्वे

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ऑगस्ट  महिन्यात मालवाहतूक क्षेत्रात एकूण 786 रॅक लोड केले असून, त्यातून  294.66 कोटी इतका माल महसूल प्राप्त केला आहे. यात सर्वाधिक महसूल कोळसा वाहतुकीतून मिळाला आहे.

---------------------------------------